



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १९ मार्च २०२५ | अंक ९१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु





# छावा चित्रपट पाहिल्यानंतर.भावना प्रज्वलित झाल्या; नागपूर हिंसाचाराबद्दल देवेंद्र फडणवीसांचं मोठं वक्तव्य

**नागपुरात झालेल्या राड्यानंतर ११ ठिकाणी संचारबंदी लागू करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला शांतता बाळगण्याच आवाहन केलं आहे. सोमवारी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल या हिंदुत्ववादी संघटनांनी राज्यभरात औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मुद्यावर आंदोलन केलं. नागपूरच्या महाल भागात अनियंत्रित जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. यामध्ये पोलीस देखील जखमी झाले आहेत.**



ङ्छावाफ चित्रपट पाहिल्यानंतर लोकांच्या भावना प्रज्वलित झाल्या आहेतः असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केलं आहे. सध्या औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा तापला आहे. नागपूरच्या महाल भागात सोमवारी रात्री मोठा हिंसाचार झाला. दोन गटांमध्ये तुफान दगडफेक झाली. हिंसक झालेल्या जमावाने रस्त्यावरील वाहनांची तोडफोड केली. वाहनांना आगी लावल्या. याप्रकरणी पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबवत जवळपास ५० जणांना घराघरातून ताब्यात घेतलं आहे. नागपूर शहरात आज तणावपूर्ण शांतता आहे. यावर विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ङ्छावा चित्रपट पाहिल्यानंतर लोकांच्या भावना प्रज्वलित झाल्या आहेत. राड्यात ३३ पोलीस आणि ५ नागरिक जखमी झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधानसभेत घडलेल्या घटनेवर वक्तव्य केलं आहे. नागपुरात झालेल्या राड्यानंतर देवेंद्र फडणवीस म्हणाले, ङ्कुणी दंगा करण्याचा प्रयत्न केला तर कारवाई केली जाईल पोलिसांवर हल्ला करणा-यांना सोडणार नाही.. राड्यात काही ठराविक घरं आणि अस्थापनांना लक्ष करण्यात आलं आहेः असं देखील मुख्यमंत्री म्हणाले.

विधनासभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेले महत्त्वाचे मुद्देः

- हंसापुरी भागात दगडफेक झाली, तिथे अनेकांवर हल्ला करण्यात आला. भालदारपुरा भागातही राडा झाला आहे. पोलिसांवर देखील हल्ला करण्यात आला आहे.
- नागपुरात काही ठिकाणी संचारबंदी लागू करण्यात आली आहे.
- पोलिसांवर हल्ला करणा-यांना सोडणार नाहीः असं देखील देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

# सुनीता विल्यम्स पृथ्वीवर परत येणार असल्याने भारतात आणि अमेरिकेत मोठा उत्साह

**भारतीय वंशाच्या नासाच्या अंतराळवीर सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर अखेर ९ महिन्यांनी पृथ्वीवर परतले. आज पहाटे ( भारतीय वेळेनुसार) ३.३० च्या सुमारास फ्लोरिडाच्या किनारी त्यांचे सुखरूप आगमन झाले. ९ महिन्यांपेक्षा अधिक काळा अंतराळात घालवून परत आलेल्या या दोघांची ऐतिहासिक अंतराळ मोहीम यशस्वी रित्या पूर्ण झाली.**



अखेर सुनीता विल्यम्स पृथ्वीवर परतणार आहे. त्यामुळे अमेरिकेतच नव्हे तर भारतातही उत्साहाचं वातावरण आहे. भारतातील तिच्या पूर्वजांच्या गावात तर सर्वच जण देव पाण्यात घालून तिच्या येण्याची वाट पाहत आहेत. सुनीताच्या नातेवाईकांमध्येही उत्साहाचं वातावरण आहे. सुनीताची चुलत बहीण फाल्गुनी पंड्याने खास मुलाखत दिली आहे. मीडियाला दिलेल्या या मुलाखतीत तिने पूजा अर्चा आणि हवन केल्याचीही माहिती दिली आहे. तिच्या वडिलोपार्जित गावात खुशीचं वातावरण पसरलं आहे. तिच्या मोठ्या भावानेही गावात पूजापाठ सुरू असल्याचं सांगितलं आहे.सुनीता विलियम्सची चुलत बहिणी फाल्गुनी पंड्याने न्यू जर्सीतील एका मुलाखतीत बरीच माहिती दिली आहे. आम्ही सुनीताच्या परत येण्याबद्दल खूप उत्साहित आहोत. सुनीता सुखरूप यावी म्हणून आम्ही मंदिरात पूजा आणि हवन करणार आहोत.सुनीता तिच्या सोबत अंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रात गणेशाची मूर्ती घेऊन गेली होती. तिने मला अंतराळ केंद्रावर गणेशाचं एक छायाचित्र पाठवलं होतं. २००७ मध्ये आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटलो होतो, तेव्हा ते गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर सुनीता आणि तिच्या वडिलांनी अमेरिकेत पंतप्रधान मोदींची भेट घेतली होती. सुनीताला भारतीय जेवण खूप आवडते.

# पिंपळनेर हद्दीत हवेत गोळीबार, तिघे पोलिसांच्या ताब्यात

बीड : दिनांक १४/०३/२०२५ रोजी रात्री १०:०० ते ११:३० वाजेच्या दरम्यान नाथापुर ता. बीड येथे गावठी पिस्टलमधुन काही इसमांनी हवेत गोळीबार केला असल्याची माहीती दिनांक १५/०३/२०२५ रोजी पिंपळनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. मधुसुदन यांना मिळाली होती. त्याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत साहेबांना माहीती देवून सोबत, स्थागुशाचे पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर, ग्रेपोउपनि तुळशीराम, पोह/१६२६ राहुल, पोह/५६८ कैलास, पोह/१३ मनोज व पिंपळनेर पो.स्टे. चे पोअं/८८७ अविनाश अशांनी मौजे नाथापुर येथे जावुन घटनेची गोपनिय बातमीदारांकडे विचारपुस केली असता असे समजले की, दिनांक १४/०३/२०२५ रोजीच्या धुलीवंदन सणाच्या निमीत्ताने रवि राध्येशाम वक्ते याचे शेतात जेवणाची पार्टी होती. त्यावेळी रवि वक्ते याने त्याच्या साथीदाराकडील गावठी पिस्तुलातून हवेत गोळीबार केल्याची खात्रीलायक माहीती मिळाली. त्यावेळी पथकाने संशयीत (१) अजय अण्णसाहेब साबळे रा. सिदोड २) रवि राध्येशाम वक्ते, ३) महादेव सर्जेराव चव्हाण रा. नाथापुर ता. बीड यांना ताब्यात घेवुन कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता रवि वक्ते याने अजय साबळे याचेकडील गावठी पिस्तुल घेवुन त्यातुन एक राऊन्ड हवेत फायर केल्याबाबत कबुली दिली. तसेच गुन्ह्यात वापरलेले गावठी पिस्तुल हे अजय अण्णासाहेब सावळे रा. सिदोड याचे राहते घरी असल्याचे सांगीतले. पथकाने दोन पंचांना बोलावुन सिदोड येथे जावुन पंचांसमक्ष अजय साबळे याचे घरातुन ५०,०००/ रुपये किमतीचे एक लोखंडी गावठी पिस्तुल




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १९ मार्च २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

## बलुचिस्तानचा असंतोष पाकिस्तानच्या मुळावर!

जो देश दुसऱ्या देशाविरोधात कायम अशांतता फैलावत असतो त्यालाही तशाच संकटांना सामोरे जावे लागते. पाकिस्तान इतकी वर्षे भारताविरोधात अशांतता फैलावत आहे आणि नाना कारवाया करत आहे. पाकिस्तानला आता जशास तसे कारवायांना सामोरे जावे लागत आहे. पाकिस्तानची अवस्था अगोदरच अत्यंत नाजूक आहे आणि यातच बलुचिस्तानातील दहशतवादी कारवायांना तो देश आळा घालू शकलेला नाही. त्यामुळे परवा बलुचिस्तानमध्ये तेथील दहशतावादी संघटना बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने त्या चिमुकल्या देशातील जाफर एक्स्प्रेसचे अपहरण केले आणि प्रवाशांना ओलीस ठेवले. ४५० प्रवासी रेल्वेत होते. त्यात अनेक सुरक्षा रक्षकही होते. बीएलए दहशतवाद्यांनी कथित स्फोटकांनी रेल्वे उडवून दिली आणि त्यात काही लोक आणि दहशतवादी ठार झाले. त्यानंतर दहशतवाद्यांनी बोगींवर गोळीबारही केला. बलुचिस्तान हे पाकिस्तानच्या अंगावरील भळभळणारी जखम आहे आणि त्याला कारणही पाकिस्तानच आहे कारण पाकिस्तानने बलुचिस्तानला कधीही त्याचे न्याय हक्क दिले नाहीत. गेल्या २० वर्षांपासून बलुचिस्तानचा प्रश्न सतावत आहे आणि पाकिस्तानने त्यावर कधीही उपाय शोधलेला नाही. उलट पाकिस्तानने सारा वेळ भारताविरोधात काड्या करण्यात आणि आपल्या मांडीवर बसून कारवाया करणाऱ्या दहशतवाद्यांना पोसण्यातच घालवला. त्यात आता बलुचिस्तानने पाकिस्तानला धडा शिकवण्याचा निर्धार केला असेल, तर त्या देशाची काही चूक नाही. बलुचिस्तान हा कित्येक वर्षे अशांत आणि अस्वस्थ आहे. बलूच लिबरेशन आर्मीने त्या देशाच्या स्वातंत्र्याचा लढा सुरू केला आहे त्याला आता वीस वर्षे झाली. पण त्यात अजूनही उपाय सापडलेला नाही. बलूच देशाकडून आतापर्यंत जे हल्ले करण्यात आले त्यांची जबाबदारी बीएलएने स्वीकारली आहे. बलुचिस्तान प्रश्नाचे मूळ त्याच्या पाकिस्तानच्या जवळकीत आहे. पाकिस्तानचा ४४ टक्के भूभाग असलेल्या बलुचिस्तान हा ब्रिटनकडून १९४७ मध्येच स्वतंत्र झाला. पण प्रामुख्याने बलूच लोकांना पाकिस्तानात सामील होण्यास भाग पाडण्यात आले. भारताची फाळणी होऊन बलूचला वेगळे काढण्यात आले पण बलूच लोकांच्या ते इच्छेविरोधात होते. त्यानंतर पाकिस्तानने बलूच लोकांवर सातत्याने अन्याय केला आणि जे बांगलादेशाचे झाले तेच बलुचिस्तानचे करू पाहिले. त्यामुळे बलुचिस्तान हा कायम अशांत भूभाग म्हणून राहिला. असंख्य बलूच लोकांना इच्छा नसतानाही पाकिस्तानात सामील होण्यास भाग पाडण्यात आले. त्याचा असंतोष त्यांच्या मनात आजही आहे. बलूचवर आपला ताबा प्रस्थापित करण्यासाठी इस्लामाबादने म्हणजे पाकिस्तानने तेथे जबरदस्तीने अनेक अत्याचार केले. आक्रमणे केली आणि तेथील भूभाग घशात घालू पाहिला. बीएलएने पाकिस्तान विरोधात शस्त्रे उचलून आणि संघर्ष सुरू करून आता २० वर्षे लोटली आहेत. पण प्रश्न तसाच आहे. गेली दश वर्षे बलुचिस्तानने अनेक उठाव पाहिले आहेत आणि सध्याची स्थिती ही त्या उठावांचे एक प्रकारे दर्शन आहे. हा प्रांत अनेक वर्षे बलूच लोकांवर जो अन्याय झाला आणि स्थानिकांची दडपशाही झाली त्याविरोधात लोकांनी उठवलेला आवाज आहे. तो आता पाकिस्तानला दडपता येणार नाही असे दिसते आहे. बलूच लिबरेशन आर्मीने केलेल्या जाफर एक्स्प्रेसच्या अपहरणामुळे आणि त्यात अनेक प्रवासी ठार झाल्याच्या घटनेने पाकिस्तान हादरला आहे. आधीच पाकिस्तानची हालत अतिशय वाईट आहे. अमेरिकेने मदत बंद केली आहे आणि इतर देशांकडे तोंड वेंगाडण्याची सोय नाही. त्यातच देशात निर्माण झालेले हे संकट पाकिस्तानला अस्वस्थच नव्हे, तर विषण्ण करणारे आहे. पण त्याचे आपल्याला वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण जसे पेरावे तसे उगवते हा न्याय आणि त्यानुसार आता पाकिस्तानच्या नशिबी जे आले आहे ते पाकिस्ताननेच पूर्वी आपसूकच ओढवून घेतले आहे. बलुचिस्तान हा प्रांत खरे तर खनिज संपत्तीने अत्यंत समृद्ध आहे. पण पाकिस्तानने त्या प्रांतावरही अन्याय केला आणि आज तो प्रांत प्रचंड धूमसतो आहे. चीनचे अनेक प्रकल्प याच भागात आहेत. यंदा बलुचिस्तानातील हल्ले आणखी कडक झाले आहेत आणि त्याविरोधात पाकिस्तान लष्कर काहीही करू शकत नाही अशी स्थिती आहे. पाकिस्तानला आधीच स्वतःच्या संकटांशी तोंड देताना नाकी नऊ येत आहेत. त्यात आता हे संकट त्याने ओढवून घेतले आहे. पाकिस्तानने आता तीव्र धोरण आखले असले तरीही त्याच्याकडे फारसे पर्याय नाहीत. कारण बलुचिस्तान हा मोठा प्रांत आहे आणि लोकसंख्या विभागलेली आहे. त्यामुळे पाकिस्तान हतबल ठरला आहे. पाक सरकार संपूर्ण सुरक्षा देऊ शकत नाही आणि त्यामुळे पाकिस्तानची अडचण झाली आहे. मध्यंतरी पाकिस्तानने बलुचिस्तान पेटवल्याबद्दल भारतावर आरोप करून पाहिले. पण त्यावर कुणाचाही विश्वास बसला नाही. कारण भारताचा अशा गोष्टींवर विश्वास नाही हे साऱ्या जगाला माहीत आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या बोंबा या कागदावरच राहिल्या. त्याला अगदी अमेरिकेनेही मनावर घेतले नाही. बलुचिस्तानची सीमा लागून आहे ती अफगाणिस्तानला. त्यामुळे त्या देशाविरोधात पाकिस्तान काहीही शकत नाही. कारण अफगाणिस्तानचे पाकिस्ताशी किती शत्रुत्वाचे संबंध आहेत हे साऱ्यांनाच माहीत आहे, पण पाकच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे बलूच दहशतवाद्यांची वाढती ताकद. आणि बीएलए ही सर्वात संघटित शक्ती आहे. त्यामुळे पाकिस्तानला त्याविरोधात लढणे अवघड जात आहे. सर्वात अवघड सवाल हा आहे पाकिस्तानने नेहमीच बलुचिस्तानला आपल्या दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न केला. पण बलूच लोक आता जागृत झाले आहेत आणि ते कुणाच्या दडपणाला बळी पडणार नाहीत. बलूच दहशतवाद्यांना मदत शेजारील अफगाणिस्तानकडून मिळते आहे असे अनेकांचे मत आहे. त्यामुळे पाकिस्तान दहशतवाद्यांकडून संघर्षाला सामोरे जात आहे आणि ही स्थिती त्याला अधिकच खड्ड्यात घालणारी आहे. पाकिस्तान आता भोगतो आहे आणि जे त्याने भारताच्या नशिबी एकेकाळी लिहिले होते. पण भारत त्यातून अंगभूत सामर्थ्याने बाहेर आला आणि आता पाकिस्तानपेक्षा कितीतरी ताकदवान आहे. पाकिस्तान मात्र नव्या खाचखळग्यात सापडत आहे आणि हेच त्याचे प्राक्तन आहे.

# मटणाचा झटका!

राज्याचे मत्स्योद्योग आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी मटण दुकानांना ङ्गमल्हार प्रमाणपत्रफदेण्याचा निर्धार केला आहे. ङ्गमल्हार सर्टिफिकेशन डॉट कॉममच्या माध्यमातून फक्त हिंदू समाजातील खाटिकांना हे प्रमाणपत्र मिळणार आहे. ङ्गमल्हार सर्टिफिकेशनफ नसेल तिथे मांस खरेदी करू नका, असे आवाहनही नितेश राणे यांनी केले आहे त्यामुळे नवा वाद उफाळून आला आहे. मल्हार सर्टिफिकेशनच्या माध्यमातून आपल्याला आपल्या हक्काची मटण दुकाने उपलब्ध होतील, विकणारा व्यक्तीदेखील हिंदू असेल. कुठेही मटणामध्ये भेसळ झालेली आढळणार नाही. मल्हार सर्टिफिकेशनचा वापर जास्तीत जास्त करावा, जिथे मल्हार सर्टिफिकेशन नसेल तिथे मटण खरेदी करू नये, असे आवाहन नितेश राणे यांनी केले. हिंदू समाजासाठी अतिशय महत्त्वाचे पाऊल आम्ही उचललेले आहे, असेही ते म्हणाले. महाराष्ट्र हा सामाजिक सलोख्याचा आदर्श मानला जातो मात्र गत काही दिवसांतील घडामोडी पाहता हा सलोखा या पुढेही कायम राहील का? असा प्रश्न पडतो. राज्याचे मंत्री नितेश राणे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्रिमंडळातील एक जबाबदार कॅबिनेट मंत्री असल्याने त्यांनी जाहीर केलेली योजना आणि घोषणा हा राज्य सरकारचा निर्णय आहे, असे गृहीत धरले जाते. नितेश राणे हे अनेक कारणांनी कायम चर्चेत असतात. आता त्यांनी मटण दुकानदारांना मल्हार प्रमाणपत्र देण्याच्या धोरणाला पाठिंबा जाहीर करत हलाल विरुध्द झटका वाद पेटवून दिला आहे. जनतेने हिंदू समाजातील दुकानदारांकडूनच मटण विकत घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. या प्रमाणपत्राबाबत अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. धर्मनिरपेक्ष देशात अमूक एका धर्मियांकडूनच खरेदी करा, असे आवाहन आणि तेही एका मंत्र्यांकडून केले जाणे हे कोणत्या चौकटीत बसते ते जनतेला समजले पाहिजे. एकीकडे राजर्षि शाहू, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हा महाराष्ट्र आहे, असे म्हणायचे आणि दुसरीकडे धर्माधर्मांत फूट पडेल, असे निर्णय जाहीर करायचे. हे इंग्रजांच्या झोडा, फोडा आणि राज्य करा या धोरणासारखेच आहे. पुरोगामी महाराष्ट्र आपण किती मागे घेऊन चाललो आहोत याचा विचार मंत्री करत नसतील तरी सरकारला हे मान्य आहे का? याचा उलगडा झाला पाहिजे. सत्ताधारी पक्षातील काही नेत्यांनी हे सरकारचे नव्हे तर एका संघटनेचे मत आहे, अशी भूमिका घेतली आहे; परंतु सर्वसाधारणपणे मंत्रिपदावरील नेत्यांनी केलेले वक्तव्य सरकारच्या वतीने करण्यात आल्याचे मानले जाते. मंत्रिमहोदय केवळ मल्हार प्रमाणपत्राबाबत वक्तव्य करून थांबले नाहीत तर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराच्या धोरणाबाबतही काही वादळी वक्तव्ये केली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात कोणीही मुस्लिम सरदार नव्हते. स्वराज्याची लढाई ही इस्लामच्या विरोधातच होती, असे उद्गार निलेश राणे यांनी काढले आहेत. महाराष्ट्रासाठी हा एक ऐतिहासिक धक्काच आहे. अनेक थोर इतिहास संशोधकांनी केलेल्या संशोधनाच्या आधारे शाळेत शिकविला जाणारा इतिहास असा कधीच नव्हता. छत्रपती शिवाजी महाराजांना आग्र्याहून सुटका करून घेताना त्यांना मदत करणा-यांमध्ये मदारी मेहतर होता. त्यांच्या आरमारात दौलत खान हा महत्त्वाचा सरदार होता. सिद्दी हिलाल हा त्यांचा विश्वासू सहकारी होता. हाच इतिहास शालेय शिक्षणातून शिकत अनेक पिढ्या मोठ्या झाल्या आणि आता नितेश राणे तो चुकीचा ठरवत आहेत. हिंदवी स्वराज्य म्हणजे हिंदू आणि मुस्लिम यांची लढाई होती, असा शोध नितेश राणे यांनी लावला आहे. वास्तविक पाहता हिंदू स्वराज्याची परिभाषा अशी की, हिंदवी म्हणजे हिंदुस्थानात राहणारे. मग ते कोणत्याही धर्माचे वा जातीचे असोत त्यांचे राज्य ते हिंदवी स्वराज्य, असे शालेय पुस्तकात नमूद आहे. आपल्या मुस्लिम सैनिकांसाठी शिवाजी महाराजांनी मस्जिदी उभारल्या होत्या. त्यांचा लढा हा मुघलांकडून होणा-या अन्याय अत्याचाराविरोधात होता, असे इतिहास संशोधक सांगतात. आता नितेश राणे जे काही सांगत आहेत त्याच्याशी हे सारे विसंगत आहे. पाठ्यपुस्तकात एक आणि नेत्यांच्या ओठी भलतेच, असे चित्र आहे. यातून कोणाची नाचक्की होत असेल तर ती सरकारचीच! कोणत्याही संशोधनाच्या आधाराशिवाय नेत्यांनी, असे जाहीररित्या बोलणे म्हणजे चुकीच्या इतिहासाची पाठराखण करण्यासारखी आहे. असाच इतिहास पुढे सत्य असल्याचे गृहीत धरले जाण्याचाही धोका आहे त्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम दूर करण्याचे काम सरकारला करावे लागणार आहे. आता सरकारने नितेश राणे यांच्या वक्तव्याशी सरकारचा काही एक संबंध नाही, असे जाहीर करावे अथवा त्यांनी मांडलेला इतिहास योग्य आहे, असे साधार स्पष्ट करत शालेय शिक्षणात समाविष्ट असलेला इतिहास बदलण्याचे काम करावे. मंत्री हे मुख्यमंत्र्यांना डोईजड होत आहेत, असा संदेश जाणे योग्य नाही. राज्यातील वातावरण बिघडवण्याचे काम किमान सरकारने तरी करू नये. गत काही दिवसांत जे काही बोलले जात आहे, निर्णय घेतले जात आहेत ते धार्मिक विखार पसरविणारे आहेत. यामुळे समाजात निर्माण होणारी तेढ, रुंदावत जाणारी दरी राजकारण्यांच्या दृष्टीने पथ्यावर पडणारी असली तरी त्याचे दीर्घकालीन परिणाम समाजासाठी विषारीच ठरतील. मंत्री नितेश राणे यांच्या भूमिकेचा अनेकांनी विरोध केला आहे. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही असहमती दर्शविताना म्हटले आहे की, मटण झटका असो वा हलाल आपल्याला खायला मिळाले पाहिजे. एवढी टोकाची भूमिका घेऊ नका, असा सल्लाही त्यांनी नितेश राणे यांना दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात मुस्लिम सैन्य नव्हते, असे म्हणणे चुकीचे आहे.

## मराठा आरक्षणासाठी मी कायम संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांच्या सोबत-शिवाजीराव पंडित



गेवराई । प्रतिनिधी मराठा आरक्षणासाठी लढणारे संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी भेट घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. मराठा आरक्षणाशिवाय मराठा समाजाचा उद्धार होऊ शकत नाही, मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी जो लढा उभारला तो योग्यच आहे. आपण आणि शिवछत्र परिवर मराठा आरक्षणासाठी आग्रही राहीलो. यापुढील काळात आपण मनोज जरांगे यांच्या सोबतच राहू असे प्रतिपादन माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी केले. माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांनी आज संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. आपण तब्येत सांभाळावी, मराठा समाजाला आपली गरज आहे. तुमच्या छायेखाली मराठा समाज एक झाला असून ही वज्रमूठ आता कोणीही रोखू शकत नाही. मराठा आरक्षणासाठी आपण कायम रस्त्यावर उतरलो. या वयातही आपण मराठा आरक्षण मिळवण्यासाठी संघर्ष केला. यापुढील काळात मराठा आरक्षणासाठी आपण कायम मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत आहोत असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी त्यांच्या सोबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नांदेडमध्ये सांस्कृतिक विभागाच्या तीन दिवसीय लोककलांचा महोत्सव

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित असंघटित लोककलांचा महोत्सव १७ मार्चपासून सुरू झाला आहे. शहरातील कुसुम सभागृहात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या कार्यक्रमाचा शुभारंभ केला.१९ मार्चपर्यंत संध्याकाळी ६ ते १० वाजेपर्यंत रंगणार आहे. कला संस्कृती यामध्ये रस असणाऱ्या श्रोत्यांनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.या महोत्सवात गोंधळ, बहुरूपी, लावणी, गोंधळी गीते, आदिवासी नृत्य, पोवाडे, वाघ्या-मुरळी, दशावतार आदी विविध लोककला सादर केल्या जाणार आहेत. प्रवेश विनामूल्य असल्याने रसिकांना हा सांस्कृतिक सोहळा मोफत अनुभवता येणार आहे. या उपक्रमाचे आयोजन सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले असून, श्रीकृष्ण कला फाउंडेशन म होत्सव समन्वयक आहे.१७ मार्चला पहिल्या दिवशी विविध लोककलांनी या कार्यक्रमाला सुरुवात झाली





या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या लोककलांचे सादरीकरण आणि त्याबाबतची माहिती देखील यावेळी सादर केली जाते. कार्यक्रम ाच्या पहिल्या दिवशी पिंगळा जोशी या लोककलेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पहिल्या दिवशी पिंगळा जोशी, हेळवी, बहुरूपी, धनगर ओवी, कडकलक्ष्मी, करपलवी गोंधळी आदी लोककलेचे सादरीकरण झाले.पिंगळा या लोककलेबाबत प्राध्यापक डॉ. पृथ्वीराज कौर यांनी माहिती दिली. दररोज सायंकाळी सहा वाजता हा कार्यक्रम सुरू होईल नांदेडकर कलारसीकांनी या कार्यक्रम ाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.१८ मार्चः आदिवासी गोंधळ गीत, आदिवासी गोंधळ नृत्य, आदिवासी पाटा गायन, मथुरा लभान नृत्य सादर केले जाणार आहे. हा महोत्सव पारंपरिक लोककला आणि कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी रसिकांनी या महोत्सवाला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागा- अशोक पटवर्धन

## बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न

बीड, प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असून शिवसेना महायुतीचा एक भाग आहे. यामुळे आपण सर्वजण सत्तेत आहोत. या सत्तेचा लाभ जनते पर्यंत पोहचवा. काही महिन्यातच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आतापासूनच तयारीला लागा असे नवनिर्वाचित शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांनी आढावा बैठकीत मार्गदर्शन केले. याबरोबरच पुढील महिन्यात पुन्हा एकदा तालुका निहाय बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून त्यामध्ये सर्वांनी आपआपल्या कामाचा अहवाल घेऊन उपस्थित राहायचे आहे असे देखील अशोक पटवर्धन यांनी सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांना सांगितले.

काल दि. १८ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब, शिवसेना



जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत अशोक पटवर्धन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली. याबरोबरच बीड जिल्हा शिवसेनेची पुढील वाटचाल दिशा ध्येय धोरण सविस्तरपणे सम जून सांगितले. यानंतर शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी महाराष्ट्र संपर्कप्रमुख किरण चव्हाण, युवसेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे आणि ऋषि जगताप यांचे वाढदिवसानिमि त्त शुभेच्छा सत्कार करून बीड जिल्हा शिवसेनेच्या अभिष्टचिंतन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडी युवसेना शेतकरीसेना आजी माजी सरपंच पदाधिकारी लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

### एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा- जगताप, मुळूक गलधर

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्यांच्या मनातील आवडत नेतृत्व आहेत. कार्यकर्त्यांना जपणे त्यांना आधार देणे ही शिंदे साहेबांची सवय बनलेली आहे म्हणूनच शिंदे साहेबांच्या नेतृत्वात अवघ्या महाराष्ट्रभरात शिवसेनेची ताकद वाढत चालली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. आपल्या आगामी निवडणुकात संपूर्ण बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा फडकवायचा असून आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात देखील आपल्याला बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागायाचे आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आढावा बैठकीत अवाहन केले.

## चाळण झालेल्या प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नाही मात्र चांगल्या रस्त्यावरच दुबार काम ; नगरपालिकेचा मनमानी कारभार ; सोमवारी आंदोलनाचा ईशारा :- डॉ.गणेश ढवळे



बीडः- ( दि.१८) बीड शहरातील अंतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने शहरातील बहुतांश रस्त्याची चाळण झालेली आहे.त्यामुळे वाहनचालकांना मुठीत जीव घेऊन कसरत करत वाहन चालवावे लागते. शहरातील सर्वाधिक वर्दळीचा असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज रस्त्याची पुर्ण चाळण झालेली आहे.या रस्त्यावर खड्डे,वाळु,वाळु मिश्रित खडी, असल्याने धुराळा उडत असुन नागरीकांना श्वसनाचे आजार जडण्याचा धोका आहे.या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरीकांनी वारंवार नगरपरिषद प्रशासनाला केलेली आहे.मात्र नगरपरिषद प्रशासन दुरुस्तीसाठी निधी नसल्याचे रडगाणे गात आहे.मात्र याचवेळी प्रमुख रहदारीच्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्या ऐवजी नगरपालिकेने नगरपालिका कार्यालयासमोरील केवळ नगरपालिकेत येणाऱ्या वाहनांची वर्दळ असणाऱ्या आणि रस्त्यावर कुठेही खड्डे नसताना चांगल्या सुस्थितीत असलेल्या सिमेंट रस्त्यावरच पुन्हा दुबार सिमेंट रस्त्याचे काम केले आहे. त्यामुळे एकंदरीतच प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नसल्याचे कारण सांगणा-या नगरपालिका प्रशासनाने चांगल्या रस्त्यावरच दुबार रस्ता करून जनतेच्या पैशाची उधळपट्टी का केली?? हा प्रकार ठेकेदारांचे खिसे भरण्याचा प्रकार असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असून मुख्य रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्यात यावेत या मागणीसाठी सोम वारी या प्रकरणी नगरपरिषद कार्यालयावर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# अकोली गावातील भ्रष्टाचाराची चौकशी करा

परतूर तालुक्यातील अकोली येथील - ग्रामपंचायतच्या सरपंच, ग्रामसेवकांसह संबंधित अधिकाऱ्यांनी विविध विकास कामांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी आज १७ मार्चपासून जिल्हा परिषदेसमोर बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. या घोटाळ्याची तात्काळ चौकशी होईपर्यंत बेमुदत उपोषण मागे घेणार नसल्याचा इशाराही उपोषणकर्त्यांनी दिला आहे. परतूर तालुक्यातील अकोली ग्रामपंचायत येथे मातोश्री पाणंद रस्ते, नाला पुनरुज्जीवन, रेनवॉटर हार्वेस्टिंग, सिमेंट रस्ते व पेव्हर ब्लॉक, भूमिगत गटार, वैयक्तिक लाभ शेततळे, सिंचन विहिरी वैयक्तिक लाभ, १५ वा वित्त आयोग, जनसुविधा अंतर्गत सिमेंट रस्ते आदी विविध विकासकामे व योजनांमधून झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची विनंती करूनही चौकशी न करण्यात आल्याने ३ मार्च रोजी दिलेल्या अर्जाप्रमाणे आज १७ मार्च रोजीपासून उपोषण सुरू करीत आहोत. अकोली येथे २०१७ ते आजपर्यंत विविध विकासकामांच्या व योजनांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. परंतु, आपल्या कार्यालयाकडू न कुठलीही दखल न घेतल्यामुळे आज १७ मार्च रोजीपासून आम्ही उपोषण सुरू करत असल्याचे उपोषणकर्ते सिद्धेश्वर सोळंके, पंजाब देशमुख, रवि भानुसे, ओमकार देशमुख, विकास खुळे, सुधाकर सोळंके यांनी म्हटले आह

# खापरवाडी (रत्नापूर )या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन,प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर

## क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ,आयोजक दत्ता पटाईत यांचे आव्हान

वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा चषक खापरवाडी रत्नापूर २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे, दिनांक २० ,३.२०२५ वार गुरुवार रोजी सकाळी नऊ वाजता रत्नापूर या ठिकाणी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे ,तरी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटक जयसिंग भैय्या सोळंके माजी सभापती जिल्हा परिषद बीड यांच्या हस्ते होणार आहे, या कार्यक्रमाला पंचक्रोशातील क्रिकेट प्रेमी उपस्थित राहावे, व या क्रिकेट संघातर्फे प्रथम बक्षीस खापरवाडी चे विद्यमान सरपंच सचिन लंगडे व उपसरपंच ऋषिकेश पटाईत यांच्यावतीने ३१ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे, दुसरे बक्षीस औदुंबर सावंत माजी जिल्हा परिषद सदस्य व आनंद काळे यांच्यावतीने १५ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे, व तिसरे बक्षीस डॉ,गणेश सुरवसे, यांच्यावतीने ७५०० च बक्षीस देण्यात येणार आहे, यामध्ये विशेष सहकार्य बजरंग बप्पा साबळे तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी, संभाजी तात्या शिंदे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी, विश्वास आगे माजी सरपंच




देवडी, ज्ञानेश्वर सुरवसे माजी सरपंच देवगाव, गोविंद बादाडे उपसरपंच काडीवडगाव, ईश्वर पटाईत माजी ग्रामपंचायत सदस्य खापरवाडी, नितीन लंगडे, बब्रुवान इतापे सचिव सेवा सहकारी सोसायटी, नितीन गोजे इंडियन आर्मी, रामहरी पटाईत गणेश पॅथॉलॉजी हे पाणी सेवा देणार आहेत, मॅन ऑफ द मॅच, साई राम बॅटरी वडवणी, बेस्ट बॅट्समन मुकुंद लंगडे हर्षद टायर्स म ाजलगाव, बेस्ट कीपर संग्राम चोरगे संग्राम मल्टी सर्विसेस खापरवाडी, मॅन ऑफ द सिरीज तानाजी आजबे इंजिनियर पंचायत समिती वडवणी, आयुष ट्रेडर्स चे मालक वैभव लंगडे ,बेस्ट बॉलर दादासाहेब गव्हाणे इंडियन आर्मी, यांच्या सर्वांच्या सहकार्याने व आयोजक क्रिकेट प्रेमी कमिटी यांच्यावतीने खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी भव्य क्रिकेट स्पर्धा मोठ्या प्रमाणात उत्साहात पार पडणार आहे या कार्यक्रमाला या क्रिकेट प्रेमींच्या खेळाला वाव देण्यासाठी परिसरातील क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने युवक बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहण्यात यावे असे आव्हान आयोजक दत्ता पटाईत यांच्या वतीने करण्यात आले आहे,

# पीएसआय बोंबाळे यांची सेवानिवृत्ती एएसपी पांडकर यांनी केला सत्कार



बीड (प्रतिनिधी): येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात कार्यरत पोलिस उप निरीक्षक भीमराव यादवराव बोंबाळे हे नियत वयोमानानुसार २८ फेब्र ुवारी २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या उपस्थितीत बोंबाळे यांना सपत्नीक गौरविण्यात आले. बोंबाळे यांनी चकलांबा, केज, बीड शहर, माजलगाव, पिंपळनेर आणि शिवाजीनगर आदी पोलिस ठाण्यात ३७ वर्ष पूर्ण सेवा केली. आपल्या पोलिस खात्यातील सेवेच्या काळात त्यांना विविध बक्षीस मिळविले. त्यांनी अत्यंत प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी आणि अधिकारी म्हणून कार्य केले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे विश्वासू म्हणून सुपरीचित् आहेत. अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे, पोलीस निरीक्षक संतोष साबळे आदींच्या उपस्थितीत बोंबाळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

# नवीन रेल्वे, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांना गती द्या

## खा.बजरंग सोनवणे यांच्या मुंबईतील बैठकीत अधिकाऱ्यांना सुचना, दोन्ही विभागाकडून घेतला आढावा

बीड: अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग, धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी देण्यात आला असून सर्व्हेक्षणाच्या कामाला गती द्या, राष्ट्रीय महामार्गाचे अर्धवट असलेली कामे तातडीने पुर्ण करा, नवीन दोन रस्ते दर्जोन्नत करुन राष्ट्रीय महामार्ग करावेत अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी दिल्या. दि.१७ मार्च रोजी दिल्ली येथील संसदेत बीड रेल्वे जंक्शन व रेलमार्ग कामांनी गती देण्यासाठी आवाज उठविला होता. यानंतर दि.१८ रोजी सरव्यवस्थापक कार्यालय, सीएसटी मुंबई येथे खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला सरव्यवस्थापक धरमवीर मीना, एस.एस. गुप्ता, ए.के.पांडे, सीपीआरओ स्वप्नील निला, डीजीएम के.के.मिश्रा यांची उपस्थिती होती. यावेळी अश्विनी वैष्णव यांनी धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी दिला असून आता तातडीने सर्व्हेक्षणाचे काम सुरू करावे, अहिल्यानगर-बीड- परळी रेल्वेचे काम सुरू आहे. आता अहिल्यानगर ते बीडपर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी झालेली आहे. तर पुढील कामाला गती देऊन लवकरात लवकर परळीपर्यंतचे काम पुर्ण करावे, अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामामुळे काकडवाडी, सोलापूरवाडी, धानोरा, कडा, कारेगाव, विघनवाडी, हिवरसिंगा, चऱ्हाटा, ढोलेवस्ती आणि इतर ठिकाणी सडक वाहतूक बाधित झाली आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, वृद्ध आणि प्रवाशांना अडचणी येत आहेत. यासाठी या ठिकाणी तसेच बीड-परळी मार्गावरील आवश्यक ठिकाणी पुल बांधण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कार्यवाही करावी, अशा सुचना दिल्या तर राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या बैठकीत केंद्रीय दळणवळण विभागाचे विभागीय अधिकारी प्रशांत फेगडे यांचेसह राष्ट्रीय महामार्ग विभागाचे सर्व मुख्य अभियंते, कार्यकारी अभियंते व संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी अहमदपूर-धायगुडा पिंपळा-अंबाजोगाई-लोखंडी सावरगाव-केज-मांजरसुंबा या मार्गाला दुहेरी राष्ट्रीय महामार्ग करणे, लातूर-बर्दापूर-लोखंडी सावरगाव या मार्गासही दुहेरी मार्ग करणे, परतूर-माजलगाव-धारूर-केज-कळंब- येरमाळा-कुसळंब या मार्गातील अर्धवट कामे पुर्ण करणे, खरवंडी- आर्वी- ब्र. येळंब- न. राजुरी- बीड- वडवणी- परळी रस्ता पुर्ण करुन सुधारणा करणे, मांजरसुंबा ते चुंबळीफाटा मार्गातील अडथळे योग्य त्या उपाययोजना पुर्ण करून काम पुर्ण करणे, पैठण- पंढरपूर रा.मा. मधील मळेकरवाडी घाटामधे तातडीने डांबरीकरण करणे, चुंभळी व पाटोदा येथील अडथळे दूर करुन कामे पूर्ण करणे आदि विषयावर सविस्तर चर्चा झाली.

### या मार्गांना दर्जोन्नतीचा प्रस्ताव :

पिठ्ठी-लिंबादेवी-गारमाथा-अंमळनेर-धामनगाव-टाकळी काझी, तर दुसरा उमापूर फाटा ते उमापूर-शेवगाव या दोन मार्गांना दर्जेन्नती करणे, या विषयावर बैठकीत चर्चा झाली असून या कामासाठी अधिकाऱ्यांनी सदरील प्रक्रिया राबविण्यास सुरूवात करू, असे म्हटले. दोन्ही मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते.

### धारूर घाटावर फोकस

धारूर घाटात अनेक अपघात होऊन प्रवाशांचे बळी गेलेले आहेत. सदरील घाटाचे काम व्हावे, यासाठी खा.बजरंग सोनवणे वारंवार पाठपुरावा करत असून या घाटासाठी पर्यायी मार्ग कामाला मंजूरी मिळालेली असून तातडीने निवीदा प्रक्रिया पुर्ण करावी आणि कामाला सुरूवात करून काम पुर्ण करावे, याबाबतही अधिकाऱ्यांना बैठकीत सुचना दिल्या.




# अटर का पटरफकवितासंग्रहाला ज्ञानवर्धिनी साहित्य पुरस्कार

प्रसिद्ध बाल साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या ङ्गअटर का पटरफ या बालकविता संग्रहाला ज्ञानवर्धिनी राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार जाहीर झाला असून दि. १ एप्रिल रोजी साहित्यिक दि. बा.पाटील, सांगोलाचे आ. शहाजीबापू पाटील, माढाचे आ. अभिजित पाटील, शिक्षक आ. दत्तात्रय सावंत, आयुर्वेदाचार्य बाबुशेठ पांडकर या मान्यवरांच्या उपस्थितीत पंढरपूर येथे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. विठ्ठल जाधव यांचे ङ्गपांढरा कावळाफ (बालकादंबरी) ङ्गबटाटीची धारफ (कथासंग्रह) उंदरीन सुंदरीन आणि अटर का पटर हे बालकविता संग्रहासह ङ्गएकविसाव्या बाल शतकारंभीचे बालसाहित्यफ हा महत्त्वाचा संशोधन ग्रंथ प्रकाशित आहे.



ङ्गअटर का पटरफ हा बालकविता संग्रह महात्मा गांधी विद्यापिठामध्ये एम. ए. मराठी अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. महाराष्ट्र शासन आणि इतर नामांकित संस्थांचे अनेक पुरस्कार त्यांच्या साहित्यकृतीस लाभले आहेत. मराठी साहित्य लेखकांना प्रेरणा देण्यासाठी गेल्या दहा वर्षापासून ज्ञानवर्धिनी पुरस्कार देण्यात येतात. यावर्षी कुबेर (आबा) पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा उत्कृष्ट बालसाहित्य राज्य पुरस्कार साहित्यिक विठ्ठल जाधव यांच्या ङ्गअटर का पटरफ या बालकविता संग्रहास जाहीर झाला आहे.

# आत्महत्या केलेल्या शेतक-यांप्रती उमरा येथे सहवेदना अन्नत्याग

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : भारतासारख्या कृषी प्रधान व महाराष्ट्रातल्या सुसंस्कृत राज्यात शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागतात ही अत्यंत खेदजनक बाब आहे.तमाम आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रति १९-मार्च हा दिवस सहवेदना अन्नत्याग दिवस म्हणून पाळला जातो. १९-मार्च १९८६ याच दिवशी साहेबराव करपे व कुटुंबाने सामूहिक आत्महत्या केली होती.हा दिवस अन्न त्यागदिवस म्हणून सर्वत्र त्यांच्या प्रति संवेदना दिवस पाळला जातो.त्याचेच एक उदाहरण लोहा तालुक्यातील उमरा येथील आत्म हत्याग्रस्त शेतकरी स्वर्गीय.भीमराव चंपती सिरसाट यांनी ३-जुलै २०२१ रोजी लोहा तहसील कार्यालयात जाऊन आत्महत्या केली होती. एकर-दोन




एकर जमिनीचे मालक सरकारी भाषेत अल्पभूधारक त्यात त्यांना अर्धागवायू झाला होता.शारीरिक कष्टही करू शकत नव्हते अशी परिस्थिती त्यांची निर्माण झाली होती. सरकारकडून काही मदत मिळावी म्हणून तहसील कार्यालयाचे खेटे घालत राहिले.एके दिवशी तहसील कार्यालयाच्या आवारात फाशी घेऊन त्यांनी आत्महत्या केली. जाताना त्यांनी शेतकऱ्यांपुढील आरिष्ट्य अधोरेखित केले तसेच शासनयंत्रणेच्या संवेदनाहीनतेकडे ही बोट दाखविले.

तर तमाम आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती सहवेदना म्हणून किसानपुत्र अमर हबीब हे यावर्षी १९ मार्चला लोहा तालुक्यातील उमरा या गावात अन्य मित्रांसोबत अन्नत्याग करणार आहेत. हबीब यांनी आपल्या सहकाऱ्यांना सदरील आत्महत्याग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत देण्याचं आवाहन त्यांनी केले आहे.आत्महत्याग्रस्त कुटुंबातील बहिणीला दिलेला हा आहेर असणार आहे.या सहवेदने सोबत शेतकरी स्वातंत्र्याचा निर्धारही करा सहवेदनेला लढाईच्या निर्धाराची जोड जरूर द्या कारण शेतकरी गुलाम आहे, म्हणूनच त्याला आत्महत्या करणे भाग पडते, हे विसरू नका.असे आवाहन ही किसानपुत्र अमर हबीब यांनी शेतक-यांना केले आहे.

# प्रत्येक गावातील तलावांचे होणार आता पुनरुज्जीवन

महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने या वर्षी जोरदार तयारी केली आहे. राज्यातील प्रत्येक गावांच्या तलावातील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करणे, नाला खोलीकरण रुंदीकरण करणे यासाठी मगाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवारफ तसेच मनाला खोलीकरण व रुंदीकरणफ या योजना ताकदीने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.तलावातील गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी पूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आला आहे. कोणतीहीस्वयंसेवी संस्था अथवा ग्रामपंचायतीला या कामांसाठी अर्ज करून जिल्हा प्रशासनाने दिलेल्या पद्धतीनुसार काम करता येईल. तसेच तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे. शासनाची ही योजना गावागावात पोहोचवणे, शेतकऱ्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोहोत्सान देणे, जनजागृती करून जनआंदोलन उभे करणे, मागणी अर्ज निर्माण करणे तसेच गाळमुक्त धरण व गाळ युक्त शिवार हे टेक्नॉलॉजी पोर्टल तयार करण्यासाठी भारतीय जैन संघटना (बीजेएस) आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. अशा प्रकारची कामे आणि हजारो गावात पाण्याची कामे करण्याचा बारा वर्षांचा अनुभव बीजेएसच्या पाठीशी आहे.



बीड - पाली महसूल विभागाच्या मंडळ अधिकारी श्रीमती शीतल चाटे यांना राज्यस्तरीय रयत सामाजिक प्रतिष्ठानचा उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन करताना पत्रकार रविंद्र राऊत व सौ.शारदा रविंद्र राउत

# पद्म पुरस्कार वर्ष २०२६ साठी नामांकने सादर करण्याचे आवाहन अंतिम तारीख ३१ जुलै २०२५

नवी दिल्ली, दि.17 : दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला प्रतिष्ठित अशा पद्म पुरस्कारांची घोषणा होत असते. पद्म पुरस्कारांची नामांकने केंद्रीय गृह मंत्रालयाने सादर करण्याचे आवाहन केले असून याबाबत प्रक्रिया 15 मार्च 2025 पासून प्रारंभ झाली आहे. नामांकने सादर करण्याची अंतिम तारीख 31 जुलै 2025 आहे. पद्म पुरस्कारांसाठीचे नामांकने (https://awards.gov.in). या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टवर ऑनलाईन सादर केली जातील. देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांमध्ये पद्मविभूषण, पद्मभूषण, आणि पद्मश्री




याचा समावेश होत असून हे पुरस्कार कला, साहित्य, शिक्षण, क्रीडा, आरोग्य, सामाजिक कार्य, विज्ञान, अभियांत्रिकी, सार्वजनिक सेवा, नागरी सेवा, व्यापार आणि औद्योगिकी अशा विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी प्रदान केले जातात. प्रत्येक भारतीय नागरिक या पुरस्कारांसाठी पात्र आहेत. सरकार सर्व नागरिकांना स्वत:चे नामांकन करण्यासाठी आणि इतर योग्य व्यक्तींच्या शिफारसी सादर करण्याचे आवाहन करते, विशेषत: स्त्रिया, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांग, आणि निस्वार्थ सेवा देणाऱ्या व्यक्तींच्या शोधासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन यामाध्यमातून करण्यात आले आहे. नामांकन सादर करताना, व्यक्तीच्या उल्लेखनीय कार्याची माहिती 800 शब्दांपर्यंतच्या वर्णनात नमूद करणे आवश्यक असल्याचे गृह मंत्रालयाने त्यांच्या बातमी पत्रात म्हटले आहे. यासंबंधी अधिक माहिती केंद्रीय गृह मंत्रालयाच्या (https://mha.gov.in) संकेतस्थळावर तसेच पद्म पुरस्काराच्या पोर्टलवर (https://padmaawards.gov.in) उपलब्ध आहे.

# नामस्मरण केल्याने परमार्थ मिळतो तुकाराम महाराज करडकर यांचे प्रतिपादन..

बीड प्रतिनिधी - भक्ताचे संरक्षण करण्यासाठी भगवान परमात्मा उभा आहे. संगत चांगल्याची करा, संगत जर तुम्ही चांगल्याची करत असाल तर नक्कीच एक दिवस तुम्ही यशस्वी झाल्या शिवाय तुम्ही राहणार नाहीत. जीवनात जर काही चांगले करायचे असेल तर अगोदर संगत ही चांगल्याची करावी. नामस्मरण केल्याने परमार्थ मिळतो त्यासाठी या पृथ्वीतलावरील प्रत्येकाने नामस्मरण केले पाहिजे. जर तुम्ही नामस्मरण केले तर नक्कीच तुमचा उद्धार झाल्याशिवाय राहणार नाही. जिंदगीत फक्त चांगले रहा, हे जीवन पुन्हा नाही. राजा असूद्या एक दिवस सगळ्यांना जायचं आहे. तुम्ही असे एक दिवशी कर्म करा की तुम्ही गेल्या नंतर हजारो वर्षे झाली तर नाव निघाले पाहिजे असे कर्म करा. या देहाला दोन नावे आहेत, तन आणि शरीर तन म्हणजे देह आणि देह म्हणजे शरीर होय. बीड तालुक्यातील नांदूर फाटा जवळील खर्डेवाडी ता. जि.बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाचवा वेद निर्माते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा बीजसोहळा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे या बीज उत्सवानिमित्त



दि.०९/३/२०२५ रोजी संगीतमय श्रीमदब भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा गेल्या सात दिवसांपासून सुरू आहे. या संगीतमय श्रीमदब भागवत कथा प्रवक्त्या ह.भ.प. सौ. साक्षीताई कराडकर सदगुरू बंकट स्वामी संस्थान आळंदी देवाची यांची सुंदर अशी भागवत कथा संपन्न झाली आहे. १५ - ०३- २०२५ या दिवसाची कीर्तन सेवा ह. भ. प तुकाराम महाराज करडकर यांची संपन्न झाली. महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना मंत्रमुग्ध केले. महाराजांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावरती गोड अशी सेवा केली महाराजांनी हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।। गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।। न लगे मुक्ती आणि संपदा । संतसंग देई सदा । तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी या अभंगावर चिंतन केले. तुकोबा देवाला म्हणतात, देवा ! जर तू मला काही देऊ इच्छित असशील तर मला तुझा कधीही विसर पडू नये हेच दान दे. दुसरे काहीही मला नको. तुझे गुण मी आवडीने गाईन. हीच माझी सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे. मला तुझी मुक्ती अथवा धनसंपदा नको आहे. तू मला संतांच्या संगतीत ठेव. तुकोबा म्हणतात, देवा ! अशी कृपा तू माझ्यावर करणार असशील तर तू मला पुन्हा पुन्हा जन्माला घाल. भगवान परमात्मयाने दिलेल्या या देहाला चांगले जपा. या देवाने आपल्याला तोंड हे देवाचे नाव घेण्यासाठी दिलेले आहे. सात दिवस तुम्ही भागवत कथा ही श्रवण केली आहे. भागवत कथा श्रवण केल्यामुळे तुमचा उद्धार झाला आहे. देवाच्या संगतीत आल्यामुळे तुमचा देह पवित्र झाल्याशिवाय राहणार नाही. भगवंताने आपल्या सगळ काही दिलं आहे. सुंदर असा देह दिला आहे. ज्याच्याकडे हा देह आहे. तो सगळ्यात श्रेष्ठ आहे.

# शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार जुन्या-नव्या शिवसैनिकांची मोट बांधणार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचा निर्धार




बीड, दि.१८ (प्रतिनिधी)- शिवसेनाप्रमुखांवर नितांत श्रद्धा आणि त्यांच्या विचारांशी एकनिष्ठ असणारा शिवसैनिक आजही प्रत्येक गावात आणि घराघरात आहे. बीड जिल्हा सुद्धा याला अपवाद नाही. वीस वर्षापासून एकही आमदार आणि खासदार पक्षाचा नसतानाही आणि अनेकांनी गद्दारी करूनही शिवसैनिक मात्र आजही पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचारांशी बांधील आहे. आगामी काळात जुन्या आणि नव्या शिवसैनिकांची मोट बांधून पक्षाला उभारी देण्याचे काम प्रामाणिकपणे करणार आहे. शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार आहे असा निर्धार नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी व्यक्त केला.

उल्हास गिराम यांची शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी प्रभारी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. उल्हास गिराम यांनी आतापर्यंत पक्षाचे काम एकनिष्ठतेने केले आहे. ठिकठिकाणी त्यांच्या सत्काराचे आयोजन केले जात आहे. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. उल्हास गिराम म्हणाले, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे तो विश्वास सार्थ ठरवण्याची जबाबदारी माझी आहे. आजही बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावात आणि प्रत्येक घरात निष्ठावंत शिवसैनिक आहेत. गेल्यास वीस वर्षापासून शिवसेनेचा आमदार किंवा खासदार नसतानाही आणि अनेकांनी पदे मिळवून गद्दारी केलेली असतानाही बीड जिल्ह्यामध्ये शिवसेनेची ताकद आहे. त्या ताकदीला एकत्र करण्याचे काम आमचे आहे. जुन्या आणि नव्या शिवसैनिकांची मोट बांधून नव्या उमेदीने कामाला लागायचे आहे. बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा शिवसेनेचा झंझावात निर्माण करायचा आहे असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १९ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## शिरूर पोलिसांनी बुलेटचालकांचा फाटफाट आवाज काढला

कर्णकश आवाज काढत फटाक्यांसारखा मात्र, कानठाळ्या बसविणाऱ्या त्या बुलेटस्वारांवर शिरूर वाहतूक पोलिसांनी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनात धडक कारवाई सुरू केली असून, वेगवेगळ्या भागात कारवाई करुन जप्त केलेल्या ३५ सायलेन्सरवर बुलडोझर चालविला आहे.पोलिसांच्या कारवाईचे नागरिकांनी कौतूक केले असून, यापुढे ही अशी कारवाई सुरुच राहणार असल्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी सांगितले .त्या अनुशंगाने वाहतुक शाखेचे पोलीस हवालदार राजेंद्र वाघमोडे, महिला पोलीस हवालदार भाग्यश्री जाधव, पोलीस अंमलदार विरेंद्र सुंभे, पोलीस अंमलदार शेखर झाडबुके, पोलीस अंमलदार आप्पासाहेब कदम, पोलीस अंमलदार ज्ञानदेव गोरे, पोलीस अंमलदार विकी मैंद यांचे पथक तयार केले. शहरात रात्री-अपरात्री भरधाव वेगाने बुलेटचालक तरूण जातात. त्यांच्या दुचाकीचा वेग देखील भरधाव असतो. तर गाडीच्या सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफाय) करून त्यातून फटाक्यासारखा आवाज काढला जातो. या फटाक्यासारख्या आवाजाने ज्येष्ठ नागरिकांसह सर्व सामान्य नागरिकांना त्रास होतो. अचानक आवाज आल्यानंतर लहान मुल, महिला व ज्येष्ठ नागरिक घाबरतात देखील. परंतु, त्याचीच मजा घेत हे तरुण शहरात सुसाट सुटलेले पाहायला मिळतात. पधरा ते वीस दिवसांपासून पोलिसांनी शहरातील कॉलेज, बस स्टॅन्ड, गर्दीच्या ठिकाणी बुलेटचालकांवर कारवाई करुन त्यांचे सायलेन्सर जप्त केले.त्यानंतर पोलिसांनी जप्त केलेल्या ३५ सायलेन्सरवर मबुलडोझरफ चालवून नष्ट केले. शिरूर पोलीस स्टेशन शहर व ग्रामीण भागामधील चार चाकी वाहनांचे काळया काचांचे फिल्मींग असल्यावर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून गाडीच्या काचेच

# नागपूर दंगल फडणवीस सरकार पुरस्कृत मनोज जरांगे यांचा सरकारवर घणाघात

## यांना कोरटकर, सोलापूरकर दिसत नाही का?

संभाजीनगर । प्रतिनिधी निवडणुका आल्या की वाद उलरून काढला जातो, त्यामुळे समाजाने सावध राहणे गरजेचे कबर काढायची तर काढा, फक्त गोरगरीबांना झुंजवू नका- मनोज जरांगे निवडणूक तोंडावर ठेवून असले वाद करतात, बरं रक्षण ही तुम्हीच आहे. हे सगळे कावे आहेत. कबर इथं दंगल नागपूरला? यांचेच सरकार असून हेच कंबरीसाठी पैसे देतात, मग कबर ही तुम्हीच काढा ना. इथल्या मुसलमान लोकांना कबरीचे प्रेम असणे गरजेचे नाही, ही दंगल सरकार, फडणवीस पुरस्कृत आहे. यांना तो कोरटकर, सोलापूरकर दिसत नाही का? तिथं हिंदुत्व जागत का नाही? असा सवाल करत मराठा आंदोलक



मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर टीका केली आहे. नागपूरच्या महाल आणि हंसापुरी परिसरात सोमवारी झालेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. दरम्यान, वेरूळमध्ये मालोजी राजांची गढी आहे, तिथे आज जयंती शहाजीराजे भोसले यांची साजरी करण्यात आली.

### कबर काढायची तर काढा, फक्त गोरगरीबांना झुंजवू नका- मनोज जरांगे

निवडणूक तोंडावर ठेवून असले वाद करतात, बरं रक्षण ही तुम्हीच करता. ते मूर्ख तर तुम्ही ही मूर्ख का? इथं माझ्या मताला काय किंमत? सरकारचे लोक म्हणतात कबर हटाव. मात्र यामुळे गोरगरिबांना हे अडचणीत आणतात. मराठा आरक्षण दिले नाही. सरकार आश्वासन दिलं ते पूर्ण करत नाही. किंबहुना मुस्लिम जनतेला माझं आवाहन आहे कि कबरीवर प्रेम करू नका. सरकार तुमचे आहे कबर काढायची तर काढू शकता फक्त, गोरगरिबांना झुंझवू नका. असेही जरांगे पाटील म्हणाले. तेलंगणा ने ४२ टक्के ओबीसी आरक्षण दिले पण महाराष्ट्रात हे करणार नाही. फडणवीस असे करणार नाहीत. त्यामुळे लोकांनी शांत राहावे आणि पोटापाण्याची काम करावे, दंगली नाही. असे आवाहन ही त्यांनी केले आहेत.

# औरंगजेबाची कबर देशाच्या बाहेर फेकली पाहिजे:उदयनराजे भोसलेंची मागणी

दंगलीत दगड भरलेले ट्रक आले कुठून हे विचारण्यापेक्षा ही विकृती ठेचून कशी काढता येईल हे बघा, असे उदयनराजे भोसले म्हणाले. काँग्रेसच्या काळात अनेक दंगली झाल्या. त्याला मोठ्या प्रमाणावर आळा घालण्याचे काम भाजप सरकारने केले. काँग्रेसने द्वेष पसरवण्याचे काम केले, असा आरोपही उदयनराजे भोसले यांनी केला. औरंगजेबाची कबर काढली, तर ती या देशाच्या बाहेरच फेकून दिली पाहिजे, असेही ते म्हणाले. औरंगजेब कबरीच्या वादावरून सोमवारी रात्री ८:३० वाजता नागपूरच्या महाल परिसरात हिंसाचार उसळला. विश्व हिंदू परिषदेने मुघल सम्राट



औरंगजेबाचा पुतळा जाळला आणि त्याची कबर पाडण्याची मागणी केली. यानंतर दगडफेक आणि तोडफोड सुरू झाली. दंगलखोरांनी घरांवर दगडफेक केली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या वाहनांना आग लावली. पोलिसांवरही हल्ला झाला. यामध्ये अनेक पोलिस कर्मचारी जखमी झालेत. या हिंसाचारावर आता विविध राजकीय नेत्यांच्या प्रतिक्रिया समोर येत आहे. यावर उदयनराजे भोसले यांनीही प्रतिक्रिया देत औरंगजेबाची कबर देशाच्या बाहेर फेकून देण्याची मागणी केली. तसेच दंगलीवरून काँग्रेसवर मोठा आरोप केला. नेमके काय म्हणाले उदयनराजे भोसले? छत्रपती शिवाजी महाराज असे राजे होऊन गेले ज्यांनी सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला. राज्यकारभारात लोकांचा सहभाग असावा हा दुसरा विचार. लोकशाहीचा ढाचा रचण्याचे काम छत्रपती शिवरायांनी केले. त्यांची तुलना कोणासोबतही होऊ शकत नाही. पण छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आचरणात आणण्याचे काम मोदीजींनी केले. ही मूठभर लोकं जी व्यक्तीकेंद्रीत असतात, वैयक्तिक स्वार्थाने पेटून उठलेल्या असतात त्यांची कुठलीही जात-पात नसते. अशा लोकांना ठेचण्याचे काम समाजाने केले पाहिजे. शिवाजी महाराजांचा शासनमान्य इतिहास प्रसिद्ध करावा. शिवाजी महाराजांचा विचार देशाला अखंड ठेवू शकतो, अशी प्रतिक्रिया उदयनराजे भोसले यांनी दिली.

## अंमळनेर येथे देशी दारू पकडली



अंमळनेर । प्रतिनिधी काल दिनांक १७/३/२०२४ रोजी गुप्त बातमी दाराच्या माहितीवरून अंमळनेर बाजार तळ या ठिकाणी चार चाकी गाडीमध्ये दारूचे बॉक्स आणल्याची माहिति मिळाल्याने सदर ठिकाणी सपोनि सपकाळ साहेब यांच्या आदेशाने पीएसआय चव्हाण सर सोबत पोलीस कॉन्स्टेबल बहिरवाळ, खाडे, हवालदार डोंगरे असे रात्री अकरा वाजता छापा मारला. बाजार तळ या ठिकाणी देशी दारू बॉबी संत्रा सोबत बाळगणारा हरिभाऊ एकनाथ दिवटे, राहणार आव्हाना तालुका शेवगाव, जिल्हा अहिल्यानगर हा मिळून आला. त्याचे ताब्यात देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या ४८ बाटल्या असलेला एक बॉक्स मिळून आला. त्यावरून सदर ठिकाणची स्विफ्ट डिझायर

## एकाच दिवसात सहा टेस्ट ट्यूब बेबींचा जन्म!

आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या मदतीने अपत्यसुखापासून वंचित दाम्पत्यांसाठी आशेचा किरण ठरणाऱ्या येथील के. जी. एन. टेस्टट्युब बेबी हॉस्पिटल येथे एकाच दिवशी तब्बल सहा टेस्ट ट्यूब बेबींचा जन्म झालाआहे. हा क्षण संपूर्ण मराठवाड्यासाठी अभिमानास्पद असून, वंध्यत्वावर मात करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा मानला जातआहे. ङ्कवंध्यत्वाकडून - मातृत्वाकडेफ या ब्रीदवाक्याला नेहमी खरे करण्याचा ध्यास डॉ. आमिर शेख यांनी घेतला आहे. आयव्हीएफ उपचाराद्वारे अपत्यप्राप्तीचा आनंद घेऊ इच्छिणा या जोडप्यांसाठी केजीएन हॉस्पिटल एक विश्वासार्ह केंद्र बनलेआहे अपत्य प्राप्तीसाठी संघर्षक रणा-या जोडप्यांसाठी आयव्हीएफ (इन-विट्रो फर्टिलायझेशन) तंत्रज्ञान मोठा वरदान ठरत आहे. या प्रक्रियेद्वारे जन्मलेली ही सहा बाळं त्यांच्या कुटुंबीयांसाठी आनंदाची पर्वणी ठरली आहेत. या नवजात बाळांचे कुटुंबीय आपल्या आनंदाला शब्दात व्यक्त करू शकत नव्हते. ङ्कआम्ही अनेक वर्षे मातृत्वासाठी संघर्ष केला. के जी एन हॉस्पिटलमुळे आमचे स्वप्न पूर्णझाले.

## शिक्षण आणि शिक्षक हाच आशेचा किरण-प्रा.डॉ.उषा माने

सिरसाळा । प्रतिनिधी आजची परिस्थिती फार समाधानकारक नाही.संविधानिक मूल्य पायदळी तूडवून , समाजव्यवस्था खिळखिळी करून, अघोरी स्वप्नांची गुलाम झालेल्या व्यवस्थेमध्ये, शिक्षण आणि शिक्षक हाच अशेचा किरण आहे. असे प्रतिपादन प्रा. उषा माने यांनी केले. जिजाऊ ज्ञान मंदिर उमरी बुद्रुक तालुका माजलगाव या ठिकाणी ,वार्षिक स्नेहसंमेलनात त्या बोलत होत्या.पुढे बोलताना त्या म्हणाल्या,राजकारण समाजकारणातील पदे येतात आणि जातात राजसत्ता आणि धर्मसत्ता यांचं प्राबल्य कमी जास्त होत असतं पण आपण ज्ञान सत्तेचे पाईक आहोत याचं भान शिक्षकांनी ठेवलं पाहिजे. लक्ष्मीच्या पैशाच्या खणखणात सरस्वतीच्या विणेचा झंकार क्षीण होणार नाही. याची जिम्मेदारी शिक्षक म्हणून आपल्या खांद्यावर आहे. राष्ट्राचं चारित्र्य निर्माण करण्याचं काम शिक्षक करतात.आचार विचार आणि उच्चारातून चारित्र्य घडत असतात. ही चरित्र संपन्न माणसं समाजाला दिशा देतात. म्हणून चारित्र्यसंपन्न पिढ्या निर्माण करणे ही, शिक्षकांची जिम्मेदारी आहे.जसे एका बी मध्ये वटपृक्ष होण्याची क्षमता असते तसे एका मुलांमध्ये महापुरुष बनण्याची क्षमता असते. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्याला पर्याप्त वातावरण हवे. गुरु शिष्याची परंपरा असलेल्या भारत देशामध्ये शिक्षणाला तंत्रज्ञानाची



जोड असावी त्याबद्दल दुमत नाही. परंतु तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी या शिक्षण व्यवस्थेला शिक्षकांशिवाय पर्याय नाही. हे सुर्य प्रकाशा ईतक सत्य आहे. तरी आमच्या सरकारची धोरण तंत्रज्ञानाला खतपाणी घालणारी आहेत. जिथे जपान सारखी प्रगत राष्ट्र परंपरागत शिक्षण पद्धतीचा पुरस्कार करत असतानाच ,आम्ही मात्र वेगळेपणाच्या नादात भारतीय स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे व्यवस्थेची घडी बसवण्यात घालवली. ही सर्व व्यवस्था पूर्ती तळागारापर्यंत पोहोचू शैक्षणीक धोरण त्यातच फळ आहे. .या शिक्षण व्यवस्थेमधून शिक्षक हद्दपार करून मनुष्यबळ कमी करायचं आणि तंत्रज्ञानाचा वापर करून तळागाळातील लोकांपर्यंत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण न्यायचं आणि नफा कमवायचा ही धोरण येऊ घातलेली आहेत. आत्ता तरी पर्याय आहेत. भविष्यात पर्याय संपतील. आता मोबाईलचा रिचार्ज संपलं की, फोन बंद पडतो. तस भविष्यात रिचार्ज संपलं की, तास बंद ,सर्वसामान्यांचे शिक्षण संपवण्याचा हा घाट घातला जात आहे. शिक्षण माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवत समाजामध्ये अडाणी माणसं स्वतःचा उदरनिर्वाह छान चालवतात. पण आमचे पदवीधर बेकार अपमानित जीवन जगत आहेत. हे वास्तव समाजाच अपयश आहे. प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात.चिमणीचे पिल्लू चाळीस दिवसात आकाशात भरारी मारते. आमची माणसे ४० वर्षाची झाली तरी, उत्कर्ष करू शकत नाहीत.

# विमानतळाच्या मागणीची तेव्हा विरोधकांकडून खिल्ली, आता स्वागत

## खा.बजरंग सोनवणेंनी पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे डीपीसीच्या बैठकीत केली होती विमानतळाची मागणी

बीडः दि.३० जानेवारी २०२५ रोजी पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बीड येथे झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यासाठी विमानतळ करावे, असा ठराव मांडला होता. यावेळी पालकमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दर्शवला होता. मात्र, विरोधकांनी सोशल मिडीयावर या मागणीची खिल्ली उडविली होती. दरम्यान, दि.१७ मार्च रोजी विधीमंडळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड विमानतळ उभारण्याचा निर्णय जाहिर केला. यानंतर मात्र विरोधकांकडून या निर्णयाचे स्वागत होताना दिसत आहे. पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजीत केली होती. या बैठकीत मांजरसुंबा येथे विमानतळाची जागा निश्चित करून त्यासाठी राज्यशासनाकडून मदत मिळावी, असा ठराव खा.बजरंग सोनवणे यांनी मांडला होता. पालकमंत्री अजित पवार यांनी या विषयाला सकारात्मक प्रतिसाद देत, हा विषय मार्गी लावू, असे आश्वासनही दिले होते.



दरम्यान, बीडला विमानतळाच्या मागणीची काही लोकांकडून खिल्ली उडविण्यात आली होती. इथे अजून रेल्वेच नाही तर विमानतळाची मागणी अशा पध्दतीने काही मंडळी व्यक्त झाली होती. खा. बजरंग सोनवणे यांच्या मागणीनुसार जिल्हा प्रशासनाकडून विमानतळाचा प्रस्ताव राज्यशासनाला सादर करण्यात आला. मात्र, यानंतर दि.१७ मार्च रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यात विमानतळ उभारून विकासाला गती देण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनाकडून विमानतळाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. याचा विचार करून बीड जिल्ह्यात किमान तीन किलोमिटरची धावपट्टी करून त्याठिकाणी सुसज्ज विमानतळ उभारण्यात येईल, अशी घोषणा केली. यानंतर काही मंडळींनी पत्रक घेवून विमानतळाबाबतचे श्रेय घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. बीडला विमानतळ झाल्यास केवळ बीडचे नव्हे तर मराठवाड्यातील नागरिकांसाठी ही मोठी उपलब्धी असणार आहे. येथील व्यावसायिक प्रगतीला चालना मिळेल आणि दुरचा प्रवासही सुखकर होणार आहे. जिल्ह्यातील सर्व राजकीय पुढारी राजकीय डाव-प्रतिडाव या कामात व्यस्त असताना खा. बजरंग सोनवणे यांची विकासकामांची तळमळ व नियोजन ठळकपणे अधोरेखित होताना दिसून येत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com